# SMART

# VILLAGE

## स्मार्ट ग्राम योजना

### ग्रामपंचायत मांडवे, ता. माळशिरस, जि. सोलापूर

### सन २०१७-१८





# ग्रामपंचायत मांडवे, ता. माळशिरस, जि. सोलापूर

## स्थापना : सन १ एप्रिल १९५२

# ग्रामपंचायत मांडवे, ता. माळशिरस, जि. सोलापूर

## विद्यमान सदस्य

## कार्यकाळ:-११/११/२०१५ ते १०/११/२०२०

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | मनिषा कुमारपाटील | सरपंच |
| २ | दादासो उत्तम देवगुंडे | उपसरपंच |
| ३ | सोनाली ज्ञानेश्वरगायकवाड | सदस्या |
| ४ | कुसुम ज्ञानदेव ननवरे | सदस्या |
| ५ | उमाबाई दत्तात्रयदुधाळ | सदस्या |
| ६ | धुळा भानुदासशिंदे | सदस्य |
| ७ | जगन्नाथ तुकारामवाघमोडे | सदस्य |
| ८ | प्रभावती नारायणसाळुंखे | सदस्या |
| ९ | वसंत मनोहरचव्हाण | सदस्य |
| १० | अजिनाथ शंकर टेळे | सदस्य |
| ११ | मैना मारुतीगोफणे | सदस्या |
| १२ | शिवाजी तुकारामपालवे | सदस्य |
| १३ | तानाजी जगन्नाथपालवे | सदस्य |
| १४ | अरुणा शिवाजीगोरे | सदस्या |
| १५ | धनश्री तानाजीपालवे | सदस्या |
| १६ | दादा राजारामढोबळे | सदस्य |
| १७ | सारिका अरुणढोबळे | सदस्या |

## 2. मांडवे – दृष्टिक्षेप / गावाची माहिती

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यात मांडवे हे गाव महादेव डोंगररांगांच्या पायथ्याला वसलेले आहे गावात असलेल्या नैसर्गिक सौंदर्य व विपुल पाणीसाठा यामुळे गावाला जिल्ह्यामध्ये विशेष महत्व प्राप्त झाले आहे. मांडवे गावाची सर्वसामान्य माहिती खालीलप्रमाणे आहे.

नकाशा १. महाराष्ट्र, सोलापूर व माळशिरसच्या नकाशातील मांडवे गावाचे स्थान





सोलापूर जिल्हा

माळशिरस तालुका

तक्ता क्र. १ मांडवे गावची सामान्य माहिती

| | |
|---|---|
| जिल्हा | सोलापूर |
| तालुका | माळशिरस |
| प्रमुख वाड्या वस्त्या | लक्ष्मीनगर, भाग्यश्री नगर, बंदुकेवस्ती, शेंडगेवस्ती, करलवस्ती,साळुंखेवस्ती, शिंदेपट्टी,भोंडवेवस्ती गायकवाडवस्ती. नलगाईवस्ती, सुळवस्ती,दुधाळवस्ती, लोहारवस्ती, खुडेवस्ती, पाटीलमळा |
| लोकसंख्या ( २००१ ) | ६६२९ |
| लोकसंख्या ( २०११ ) | ७८८३ |
| लोकसंख्या ( २०१५) | ८४७६ |
| गावाचे एकूण क्षेत्रफळ | ३०८७ हेक्टर |
| शेतीखालील क्षेत्रफळ | २६८५ |
| निवासी वापराखालील क्षेत्रफळ | |
| प्रमुख व्यवसाय | शेती, दुग्धव्यवसाय,नोकरी, उद्योगधंदे इ. |

## २.१. प्रादेशिक वाहतूक व दळणवळण

मांडवे हे गाव सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यात वसलेले आहे हे गाव सोलापूर जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणाहून १३८ किमी. अंतरावर पश्चिमेस आहे. मांडवे हे गाव पुणे– पंढरपूर राष्ट्रीय महामार्गालगत असून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी मार्गावरील प्रमुख विसावा केंद्र आहे. माळशिरस, अकलूज, बारामती, फलटण दहिवडी व म्हसवड ही मांडवे जवळील काही प्रमुख गावे / शहरे आहेत. बारामती (४५ किमी ) व पंढरपूर (६५ किमी) ही नजीकची रेल्वे स्टेशन आहेत. विमान सेवेसाठी पुणे (१४९ किमी) व सोलापूर (१३८ किमी) या विमानतळावर अवलंबून राहावे लागते.

## २.२ लोकसंख्येचा तपशील.

सन २००१ च्या जनगणनेनुसार मांडवे गावची लोकसंख्या ६६२९ होती, तर २०११ च्या जनगणनेनुसा ७८८३ झाली.तर सन २०१५ साली ८४७६ एवढी झाली. ही लोकसंख्येतील वाढ गावातील वाड्यावस्त्यांचा विस्तार, गावातील मुबलक पाणीसाठा आणि कुशल व मुबलक रोजगार निर्मिती झाली असावी असा अंदाज वर्तविला जात आहे.

### तक्ता क्र. २ मांडवे गावची लोकसंख्या (२०११)

| | |
|---|---|
| एकूण लोकसंख्या (२०११) | ७८८३ |
| पुरुष लोकसंख्या | ४१२२ |
| स्त्री लोकसंख्या | ३७६१ |
| स्त्री / पुरुष प्रमाण | ९१२ |

गेल्या दशकात गावच्या लोकसंख्या वाढीचा दर घटला आहे. २००१ ते २०११ या दरम्यान गावची लोकसंख्या ६६२९ वरुन ७८८३ इतकी म्हणजे १९ % वाढली असली तरी वाढीचा हा दर १९९१ ते २००१ दरम्यान ३५ % दरपेक्षा खूपच कमी आहे. जनगणनेनुसार गावात एकूण १५१९ घरे असून कुटुंबातील सरासरी सदस्य संख्या ५.१८ इतकी आहे.

### तक्ता क्र. 3 भविष्यातील गावाच्या लोकसंख्येचा अनुमान

| वर्ष | १९९१ | २००१ | २०११ | २०२१ | २०३१ | २०४१ |
|---|---|---|---|---|---|---|
| लोकसंख्या | ४९१९ | ६६२९ | ७८८३ | ९२१७ | १०६९९ | १२१८१ |

## तक्ता क्र.४ मांडवे महसूल क्षेत्रातील लोकसंख्या विषयक तुलनात्मक आढावा

| अ. क्र. | लोकसंख्येची परिमाणे | मांडवे | माळशिरस | सोलापूर |
|---|---|---|---|---|
| १ | स्त्री-पुरुष प्रमाण | ९१२ | ९२५ | ९२२ |
| २ | बालक बालिका प्रमाण | ८४३ | ८७२ | ८७४ |
| ३ | अनुसूचीत जातीतील स्त्री-पुरुष प्रमाण | ९२० | ९५२ | ९४४ |
| ४ | अनुसूचीत जमातीतील स्त्री-पुरुष प्रमाण | १४४४ | ८९८ | ९३९ |
| | | | | |
| ५ | अनुसूचीत जातीपैकी टक्केवारी | १५% | १८% | १५% |
| ६ | अनुसूचीत जमातीपैकी टक्केवारी | ०% | १% | २% |
| | | | | |
| ७ | साक्षरतेचे प्रमाण | ६५% | ६६% | ६५% |
| ७.१ | पुरुष साक्षरता | ७१% | ७२% | ७२% |
| ७.२ | स्त्री साक्षरता | ५७% | ५९% | ५७% |
| | | | | |
| ८ | कामगार | ५०% | ४६% | ४८% |

गावातील अनुसूचीत जातींची लोकसंख्या १५% असून सोलापूर जिल्ह्याच्या टक्केवारीशी बरोबरी व तालुक्यापेक्षा कमी टक्केवारी असलेले हे एकमेव गाव आहे. जनगणनेनुसार गावात अनुसूचीत जमाती नाहीत तालुक्यात हे प्रमाण १ % तर जिल्ह्यात 2 % आहे. गावातील दारिद्र्य रेषेखालील १४१ कुटुंबे आहेत.



# ३. भौतिक वैशिष्ट्ये

गावातील एकूण जमीन ३०८७ हेक्टर इतकी असून, यातील ८९ % शेतजमीन आहे. अत्याधुनिक शेती व्यवसायाच्या दृष्टीने मांडवे हे माळशिरस तालुक्यातील महत्वाचे गाव आहे

## ३.१. भुपृष्ठ रचना

मांडवे ह्या गावातील बहुतांश जमिनीचा भाग सपाट असून गावाची समुद्रसापाटीपासून उंची ४२० मीटर ते ५४५ मीटर या टप्प्यामध्ये आहे. मांडवे गाव नीरा नदीपासून १५ किमी दक्षिणेस असून नीरा उजवा कालवा गावाच्यामधून गेलेला आहे हा कालवा गावाच्या वायव्येकडून अग्नेय दिशेकडे वाहतो. त्यामुळे गावामध्ये शेतीसाठी जास्त करून पावसावर अवलंबून रहावे लागत नाही. गावठाणचा दक्षिण भाग थोडा उंचीवर असून त्या भागात मुरूमाचे प्रमाण जास्त आहे महादेव डोंगररांगा मधील गुप्तलिंग मध्ये उगम पावणारा ओढा गावठाणाच्या उत्तर भागातून वाहत असून त्यामुळे गावाला मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. गावातील सर्व सांडपाणी या ओढ्यामधून वाहत जाते

## ३.२. जमिनीचा पोत

सोलापूर जिल्हातील बहुतांश भागात काळी माती आढळते या मातीची खोली ०.३ मिटर ते २.५ मिटर इतकी असुन ती संपूर्ण भागात दिसून येते मांडवे गावातील जमीनवर २ मिटर जाडीचा मातीचा थर आढळतो. पठारी भागात काळी मृदा आहे तर इतर भागात करडी मृदा आहे. तसेच गावात नीरा उजवा कालव्याचे जाळे व काळ्या मृदेचे मुबलक प्रमाण यामुळे सुरुवातीपासूनचसाखर पट्टू यातील गाव म्हणून ओळखले जाते

## ३.३. हवामान

सोलापूर जिल्ह्यात वर्षभर कोरडे हवामान असते. डिसेंबर ते फेब्रुवारी मध्यापर्यंत हिवाळा, तर फेब्रुवारी मध्यापासून मे अखेरपर्यंत उन्हाळा असतो. जून ते सप्टेंबर हा काळ नैऋत्य मोसमी पावसाचा असतो. ऑक्टोबर व नोव्हेंबर हे महीने मान्सून परतीचे महीने म्हणून ओळखले जातात डिसेंबरमध्ये सर्वाधिक हिवाळा असून त्यावेळी तापमान २५.१ अंश से. पर्यन्त कमी होते. तर मे महिन्यात सर्वाधिक तापमान ३९.९ अंश से. पर्यन्त वाढते. सोलापूर येथे नोंदविले गेलेले सर्वाधिक तापमान ४५.६ अंश से. इतके आहे. त्याची नोंद दि. १२ मे १९३९ मध्ये करण्यात आली. तर ७ जानेवारी १९४५ रोजी ४.४ अंश से. एवढ्या सर्वात कमी तापमानाची नोंद करण्यात आली.

## ३.४. वन क्षेत्र

सोलापूर जिल्ह्यामध्ये एकूण २२९.२७ चौ.किमी इतके राखीव व वन हक्क न सांगितलेले वनक्षेत्र आहे. मांडवे गावामध्ये सन २०१५-१६ मध्ये फक्त १८हेक्टर वन क्षेत्र उपलब्ध होते. सन २०१७-१८ या वर्षात ग्रामपंचायत, सामाजिक वनीकरण,श्री. महालक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट मांडवे तसेच ग्रामस्थ यांच्या श्रमदानातून ग्रामपंचायत गायराण,स्मशानभूमि, तलावाच्या बाजूने तसेच नीरा उजवा कालव्याच्या बाजूने मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली आहे. सन २०१७-१८ या वर्षात हेक्टर क्षेत्रामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करण्यात आली. गावठाण हद्दीमध्ये प्रती कुटुंब १ नारळाचे झाड ग्रामपंचायतीकडून देण्यात आले. गावातील वनामध्ये प्रामुख्याने ग्रामपंचातीला उत्पादन मिळवून देतील अशा वृक्षांची लागवड करण्यात आली आहे त्यामध्ये प्रामुख्याने चिंच, बांबू, आवळा, जांभूळ,

सीताफळ, निलगिरी अशा वृक्षांची जास्त लागवड केली आहे. या वृक्षांबरोबरच कडूलिंब, करंज, सू-बाभुळ, उंबर, पिंपळ अशा वृक्षांचीही लागवड करण्यात आली आहे.

चित्र .१ . मांडवे मधील वन क्षेत्र



## ३.५. वन्यजीव

मांडवे गावामध्ये मोठ्या प्रमाणावर जलस्त्रोत उपलब्ध असल्यामुळे प्राणी तसेच पक्षी यामध्ये विविधता आढळून येते. तज्ज्ञ भेटी दरम्यान गाव परिसरात घोरपड, मुंगूस, ससा, नाग, धामण, अजगर, सायाळ, रानडुक्कर, रानबोका असे प्राणी आढळतात. तसेच पांढरा खंड्या, मोठा बगळा, गाय बगळा, कावळा, चिमणी, मैना, पोपट, हरियाल असे विविध पक्षी तर गावातील तलावामध्ये बदक व पाणकोंबडी आढळून येते.

## ३.६. जमीन वापरच्या पद्धती

मांडवे गावातील एकूण क्षेत्रफळापैकी सर्वाधिक जमीन ही शेतीसाठी प्रामुख्याने वापरत आणली जाते. गावपासुन ५ किमी अंतरावर सदाशिवनगर येथे साखर कारखाना असल्यामुळे गावात ऊसाची शेती मोठ्या प्रमाणात केली जाते. गावातील वाढत्या व्यवसायांमुळे व शेतीच्या प्रचलित पीक पद्धतीमुळे गावामध्ये आर्थिक उलाढाली वेगाने होत आहेत. गावामध्ये शेतीबरोबर कुक्कुटपालन, पशुपालन, रेशीम उद्योग, खडी क्रशर, विटभट्टी अशा विविध उद्योगांसाठीही जमिनीचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे व यातून मोठ्या प्रमाणावर वैयक्तिक उत्पादन वाढविले जात आहे.

## तक्ता क्र.५. जमीन वापराचे क्षेत्रफळ

| जमिनीचा प्रकार | एकूण क्षेत्रफळ |
|---|---|
| गावाचे एकूण क्षेत्रफळ | ३०८७ हेक्टर |
| शेतीसाठी उपयुक्त जमीन | २३११ हेक्टर |
| शेतीसाठी उपयुक्त नसलेली जमीन | ३७४ हेक्टर |
| वन क्षेत्राखलील जमीन | |
| गुरांच्या चरण्याची जमीन | |
| पाणथळ क्षेत्र | ११० हेक्टर |
| व्यवसाय व उद्योगांसाठी वापरात येणारी जमीन | |

## नकाशा ३ : मांडवे मधील जमीन वापरचा नकाशा

## ४.१. वाणिज्य व उद्योग व्यवसाय

शेती, शेती पूरक उद्योग व दुग्ध व्यवसाय हे या गावातील मुख्य व्यवसाय आहेत व गावातील बहुसंख्य लोकसंख्या यामध्ये कार्यान्वित आहे. याशिवाय विटभट्टी, फर्निचर दुकान, खडीक्रशर,कुक्कुटपालन, पेट्रोल पम्प, पेव्हिंग ब्लॉक बनविणे, तयार शौचालय व शोषखड्डे बनविणे, ॲक्वा, मूर्ती बनविणे, हॉटेल, चिकन सेंटर,दुकाने इ. उद्योगांमध्ये बहुसंख्य लोकसंख्या काम करत आहे यातील बरेचसे उद्योग हे पुणे-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गालगत स्थित आहेत. गावातील सुशिक्षित वर्ग पुणे, मुंबई याठिकाणी नोकरीसाठी गेला आहे.

### तक्ता क्र.६. गावातील कुटुंब संख्येनुसार व्यवसाय / नोकरीचा तपशील

| उद्योग/व्यवसाय/नोकरी | कुटुंब संख्या |
|---|---|
| शेती | |
| पशू संवर्धन | |
| मजुरी | |
| मजुरीसाठी स्थलांतर | |
| सरकारी नोकरी | |
| खाजगी नोकरी | |
| उद्योग / व्यवसाय | |

### चित्र . २. मांडवे मधील व्यावसाय / उद्योग



मांडवे गावामध्ये ४५ % जमिनीवर ऊसाचे उत्पादन केले जाते. गावातील बहुतांश शेतकरी रासायनिक व सेंद्रिय खतांचा वापर करतात. गेल्या काही वर्षात डाळींब, पेरु, द्राक्ष, केळी, पपई अशा पिकांच्या उत्पादनातही वाढ झालेली आढळून येते. याशिवाय बाजारी, गहू, ज्वारी, मका, हरभरा, तूर अशी पिकेही घेतली जातात. तसेच फुलशेतीही केल जाते. त्यामध्ये प्रामुख्याने गुलाब व झेंडू या फुलांची शेती केळी जाते

### चित्र क्र. २. मांडवे गावामधील शेतीची विविधता.



मांडवे गावामध्ये शेतीपूरक व इतर उदोगांचाही मोठ्या प्रमाणावर विकासहोत चालला आहे. यामध्ये प्रामुख्याने रेशीम उद्योग, मत्स्यशेती, दूध उत्पादन यांचा समावेश आढळून येतो तसेच गावामध्ये सामाजिक वनीकरण यांच्या कडून रोजगार हमी योजने अंतर्गत नर्सरी सुरू करण्यात आली आहे. तसेच फर्निचर, गवंडी काम, सेंट्रिंग काम, सुतार काम, वितभट्टी यातही बराचसा मजूर वर्ग काम करतो आहे. एकंदरीत गावातील व्यवसाय / उद्योग, शेती व शेतीपूरक तसेच नोकरी यामध्ये मोठ्या प्रमाणावर लोक काम करतात. त्यामुळे गावातील बेकरीचे प्रमाण खूप कमी झाले आहेत.

### चित्र क्र. ३. मांडवे गावामधील इतर महत्वाचे उद्योग

### तक्ता क्र.७. गावातील व्यावसायिक व औद्योगिक उपक्रम

| तपशील | उपक्रम | तपशील | उपक्रम |
|---|---|---|---|
| फोटो स्टुडिओ | २ | बांधकाम साहित्य | ३ |
| चिकन / मटन शॉप | ६ | टेलरिंग | २४ |
| मेडिकल | ४ | उपहारगृह | ११ |
| ढाबा | ६ | पान शॉप | १० |
| पीठ गिरणी | १५ | स्टीलच्या वस्तु | ७ |
| चर्मकार / चप्पल दुकान | ४ | सिमेंट पुरवठा | ४ |
| झेरॉक्स | ५ | छापखाना | २ |
| वेल्डिंग | ९ | आरा मशीन | |
| विविध दुरूस्ती | ५ | सायकल दुरूस्ती | ६ |
| धन्य दुकान | २ | इलेक्ट्रिक साहित्य | ४ |
| खाजगी दवाखाना | ३ | संगणक प्रशिक्षण केंद्र | ३ |
| ग्रामपंचायतीच्या मालकीचे गाळे | १५ | सरकारी धान्य दुकान | २ |
| सलून | ७ | हार्डवेअर | ५ |
| मशीनरी | २ | कृषि सेवा केंद्रे | ४ |
| जनरल स्टोअर्स / स्टेशनरी | १५ | सुतार | ६ |
| कापड दुकान | ८ | रॉकेल | २ |
| लॉन्ड्री | ४ | व्यापारी | २० |
| मंडप केंद्र | ४ | वितभट्टी | १२ |
| दुग्ध संकलन | १२ | खडी क्रशर | ३ |
| पेट्रोल पम्प | २ | ब्युटी पार्लर | ४ |
| मंगल कार्यालय | १ | सर्विसिंग सेंटर | ४ |
| मोबाइल दुरूस्ती दुकान | ३ | CSC | २ |
| कुक्कुट पालन | १० | लकडी फर्निचर | ८ |
| ATM | १ | रेशीम उद्योग | १६ |







## ४.२. सिंचन सुविधा

सोलापूर जिल्हा दुष्काळ ग्रस्त भागामध्ये येत असला तरी मांडवे गावातील एवढी जमीन सिंचांनाखाली आहेत्याचे मुख्य कारण म्हणजे नीरा उजवा कालवा व बारमाही वाहणारा ओढा. नीरा उजवा कालव्यातून निघणारे ४६, ४७, ४८, ४९, ५० व ५१ या फाटयांनी गावामध्ये सिंचनाचे जाळे तयार केले आहे. या सिंचन सुविधेमुळे बारमाही वाहणारे २ ओढे गावामध्ये आहेत. भुजलामध्ये मोठ्या प्रमाणावर पाण्याची पातळी तयार झाली आहे. तसेच गावातील जास्तीत जास्त शेतकरी तुषार व ठिबक सिंचन सुविधेचा मोठ्या प्रमाणावर वापर करतातत्यामुळे पाण्याची बचत होते. सरकारकडून ठिबक सिंचनासाठी ५० % अनुदान उपलब्ध आहे. शेततळी व विहीरींच्या बांधकामसाठीही अनुदान उपलब्ध आहे नीरा उजवा कालव्याच्या लगत गावामध्ये ७ मोठे तलाव आहेत ते तलाव कायम भरलेले असतात. तसेच गावामध्ये पाणी साठून ठेवण्यासाठी ओढ्यावर व ओहोळवर वेगवेगळ्या प्रकारचे १५ सिमेंट बंधारे बांधले आहेत. गिरवी पूलाजवळील तलावतून मांडवे व गिरवी या दोन गावांच्या पाणीपुरवठा विहारी आहेत. गावातील बहुतांश क्षेत्र हे नीरा उजवा कालव्याच्या फाटयांवर व विहीरींवर सिंचन केले जाते. गावातील नागरिक जास्त करून पावसावर अवलंबून राहत नाहीत. या सर्व सुविधांमुळे मांडवे व आजूबाजूच्या गावामधील बरेचशे शेतकरी शेततळी विहिरी, पाझर तलाव यांचा अधिक वापर करताना दिसून येत आहेत.

### तक्ता क्र.८. शेतीसाठी उपयुक्त स्त्रोतांचा तपशील

| वैयक्तिक सिंचन सुविधा | सुविधा असणारी कुटुंब संख्या |
|---|---|
| शेततळी असलेली कुटुंबे | १७० |
| शेतात विहिरी असलेली कुटुंबे | |
| शेतात बोरवेल असलेली कुटुंबे | |
| केनल सिंचांनावर अवलंबून असणारी कुटुंबे | |
| पावसावर अवलंबून असणारी कुटुंबे | |
| | |

मांडवे गावात पिण्याच्या पाण्याची समस्या जाणवत नाही. गावामध्ये ग्रामपंचायतीच्या गावठाण लगत ओढ्यावर व केनाल लगत तळ्यावर अशा २ पाणीपुरवठा विहिरी आहेत. तसेच ग्रामपंचायत गावठाणामध्ये २ जळकुंभ आहेत. त्यामुळे

५०० लीटर एवढा पाणीपुरवठा ग्रामपंचायतीकडून केला जातो तसेच वाड्या वस्त्यांवर ४३ हातपंप आहेत.

चित्र क्र. ३. गावातील पाणीसाठा




## ४.३. पशुधन व पशु संवर्धन

पशूधन व पशू संवर्धन हे कृषी अर्थ व्यवस्था असलेल्या जिल्ह्याचे महत्वाचे घटक आहेत भारतातील शेतीची सद्यस्थिती बघता शेतकऱ्याकडे पुरेशी यांत्रिक सामग्री नसल्याने व या सामग्रीसाठी लागणारा खर्च आवाक्याबाहेर असल्याने शेतकऱ्यांना शेतीसाठी पशुबळचा वापर करावा लागतो. मांडवे गावासाठी नातेपुते हे जावळील जनावरांच्या खरेदी विक्रीचे केंद्र आहे. मागील काही वर्षात दुभात्या जनावरांची संख्या गावामध्ये घटलेली आहे तरीही मांडवे हे गाव माळशिरस तालुक्यातील प्रमुख दूध उत्पादक केंद्र आहे मांडवे गावामध्ये एकूण १५९७४ पशुधन आहे.

तक्ता क्र.९. पशुधनाचा तपशील

| पशुधन | नर | मादी | एकूण |
|---|---|---|---|
| म्हैस | ८ | ३६८ | ३७६ |
| गाय | ३२८ | ९८७ | १३१५ |
| शेळी व मेंढी | ६० | १७४५ | १८०५ |
| गाढव | ३ | १३ | १६ |
| कोंबडी | २६४ | १२१९८ | १२४६२ |
| एकूण | | | १५९७४ |


गावामध्ये पशुवैद्यकीय दवाखाना आहे. दवाखान्यामर्फत कृत्रिम बिजरोपण, निर्बिजीकरण, प्रयोगशाळा व विविध शासकीय योजना राबविल्या जातात. शासकीय योजना या प्रामुख्याने पंचायत समिती व जिल्हा परिषद यांच्याकडून लाभ मिळतो. संकरीत २ दुभात्या जनावरांचा गट वाटप करणे,१००० पक्षांचा कुक्कुट पालन गट वाटप करणे, १० शेळी + एक बोकड वाटप करणे अशा विविध योजनांमुळेही पशुधनामध्ये वाढ होत आहे.

चित्र क्र. ४. गावातील पशुधन









## ४.४. दुग्ध व्यवसाय व दूध सहकारी संस्था

मांडवे गावामध्ये १२ दूध संकलन केंद्र कार्यरत असून गावातील दूध उत्पादकांना व इतर शेतकऱ्यांना अंदाजे २६-२९ रू. प्रती लीटर इतका भाव दूधला मिळतो आहे. ( दुधातील फटच्या प्रमाणावर अवलंबून राहतो) हा भाव दूध उत्पादकांना व शेतकऱ्यांना येणाऱ्या एकूण खर्चापेक्षा बराच कमी आहे, यामुळे शेतकऱ्यांना नुकसान सोसावे लागत आहे. गावातील एकत्र गेलेले दूध मांडवे गावपासुन २६ किमी अंतरवरीलअकलूज येथील शिवामृत दूध महासंगामध्ये पोहचविले जाते. शिवामृत दुध संघाने बऱ्याच योजना सुरू केल्या आहेत, ज्यांतर्गत गावकऱ्यांना जर्सी गाई पुरवल्या जातात.

चित्र क्र. ५. मांडवे येथील दुध संस्था











## ५. मांडवे – सामाजिक पायाभूत सुविधा

मांडवे गावामध्ये परिपूर्ण व समाज हितच्या अश्या सामाजिक पायाभूत सुविधा आहेत गावातील मंदिरे, सरकारी दवाखाना, सार्वजनिक सभागृह, पशू वैद्यकीय दवाखाना, हायस्कूल, प्राथमिक शाळा, बाजार, मंगल कार्यालय, वाचनालय, क्रीडांगण, व्यायामशाळा, विद्युत वितरण इत्यादी सुविधा गावाच्या लोकसंख्येच्या दृष्टीने उपयुक्त आहेत या सुविधा गावाच्या वैभवात भर घालतात.

चित्र क्र.६. गावातील सामाजिक पायाभूत सुविधा









चित्र क्र. ७. गावातील धार्मिक स्थळे









## ५.१. वैद्यकीय सुविधा

गावातील आरोग्य सेवांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र हा प्रमुख घटक आहे. गावाच्या सामाजिक व आर्थिक विकसामध्ये याचा महत्वाचा वाटा आहे. सरकारी नियमांनुसार प्राथमिक आरोग्य केंद्रात पुढील सर्व बाबींची काळजी घेतली जाते :

- औशोधोपचार पुरविणे

- स्वच्छ पाणी पुरवठा व पायाभूत स्वच्छता सुविधा
- परिसरातील संसर्गजन्य रोगांचा प्रतिबंध व नियंत्रण
- आरोग्य विषयक आकडेवारी गोळा करणे व आरोग्य विषयक माहितीचा प्रसार करणे
- राष्ट्रीय आरोग्य विषयक योजनांचा उपयोग करून घेणे
- बालकांना जन्मापासून ठराविक कालावधीने लसीकरण करणे
- आरोग्य खात्यातील अधिकारी, सहाय्यक व इतर कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण

मांडवे गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये शासनाच्या नियमांनुसार सर्व सुविधा उपलब्ध आहेत प्राथमिक आरोग्य केंद्र व गावातील पशू दवाखाना उत्तमरीत्या कार्यान्वयीत आहेत. येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मांडवे बरोबर आजूबाजूच्या गावामध्ये तसेच वाड्या वस्त्यांवर सुविधा पुरविते मांडवे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला जिल्ह्यामध्ये वेगवेगळे पुरस्कार मिळाले आहेत. यामध्ये उत्कृष्ट कार्य तसेच उत्कृष्ट कुटुंब नियोजन याचा समावेश होतो. गावातील लोकसंख्येला पुरेशा अशा वैद्यकीय सुविधा मांडवे गावामध्ये आहेत

### तक्ता क्र.१०. मांडवे मधील वैद्यकीय सुविधा

| वैद्यकीय सुविधा | एकूण संख्या | सद्य स्थिति (चालू / बंद) |
|---|---|---|
| प्राथमिक आरोग्य केंद्र | ०१ | चालू |
| प्राथमिक आरोग्य उपकेंद्र | ०१ | चालू |
| खाजगी दवाखाना | ०३ | चालू |
| पशू वैद्यकीय दवाखाना | ०१ | चालू (१ डॉक्टर, १ कंपाउंडर) |
| पशू वैद्यकीय खाजगी डॉक्टर | ५ | कार्यरत |
| मेडिकल | ४ | चालू |

### चित्र क्र. ८. वैद्यकीय सुविधा






## ५.२. मनोरंजनाच्या सुविधा

मांडवे गावाच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार मनोरंजनच्या सुविधा आहेत. गिरवी पूलाजवळचा तलावांच्या ठिकाणी खूप शांत व सुंदर निसर्ग पाहायला मिळतो. त्या ठिकाणी पोहण्याचा आनंदही घेता येतो. त्या ठिकाणी नव्याने नर्सरी विकसित होत आहे. शिवाय त्या ठिकाणी निलगिरी, जांभूळ, सुरूची झाडे आहेत. त्याशिवाय मांडवे गावठाणा नजीक नऊमोरी

कार्यालय, नऊ मोरी, वृक्ष लागवड केलेले गायराण, रेशीम उद्योगाची ठिकाणे, फळांच्या बागा याही मनोरंजनाचे काम करत आहेत. गावातील प्राथमिक आरोग्य केंद्राला पर्यटन ठिकाण म्हणले तर वावगे ठरणार नाही. त्या ठिकाणी ग्रामपंचायतीने बगीचा विकसित केला आहे. पशू वैद्यकीय दवाखान्याच्या मागच्या बाजूला ग्रामपंचायत नव्याने २ एकर क्षेत्रामध्ये बगीचा विकसित करत आहे.

चित्र क्र. ९. गावातील मनोरंजनाच्या सुविधा



## ५.३. शैक्षणिक सुविधा

मांडवे गावामध्ये एकूण ६ जिल्हा परिषदेच्या शाळा, १२ अंगणवड्या, १ हायस्कूल , १ इंग्लिश मेडियम स्कूल अशा शैक्षणिक सुविधा आहेत. गावातील सर्व शाळा तसेच आंगणवाड्यांमध्ये परिपूर्ण मूलभूत सुविधा (पाणी पुरवठा, शौचालय, घन कचरा व्यवस्थापन, शालेय साहित्य) आहेत. गावातील सर्व शाळांनी गावात व शाळेच्या परिसरात वृक्षारोपण केले आहे. गावातील मोठया शाळा या सार्वजनिक कार्यक्रम व वृक्षारोपणात नेहमी सहभागी होतात. मांडवे गावात ३ प्रकारच्या शाळा आहेत: सरकारी शाळा, सरकारी अनुदानावर चालणाऱ्या शाळा व खाजगी शाळा.

चित्र क्र. १०. गावातील शाळा



# ५. भौतिक पायाभूत सुविधा

अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, पाणी, व शिक्षण या मानवाच्या प्राथमिक व पायाभूत गरजा आहेत. जगभरात केलेल्या अभ्यासातून व संशोधनातून हे स्पष्ट झाले आहे की एखाद्या शहराचा अथवा गावाचा विकास हा त्या गावातील भौतिक प्राथमिक सुविधांवर अवलंबून असतो. मांडवे गावामध्ये चांगल्या पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. परंतु गावाचा

गरजा मांडवे गावामध्ये परिपूर्ण आहेत.

## ६.१. गृह सुविधा

२०११ च्या जनगणनेनुसार मांडवे गावाची लोकसंख्या७८८३ इतकी असून गावामध्ये इतकी घरांची संख्या आहे यापैकी घरे पक्की आहेत. उर्वरित घरे कच्च्या स्वरूपाची आहेत. आर.सी.सी. स्लॅब व वीट, सीमेंट, पत्रा असलेली घरे पक्की घरे समजली जातात. तर दगड मातीची घरे ही अर्ध पक्की घरे आणि गवती छप्पर, पत्रा शेड ही कच्ची घरे होत. त्या अनुषंगाने मांडवे गावातील घरांचा तपशील पुढीलप्रमाणे

### तक्ता क्र.११. मांडवे मधील २०११ नुसार गृह सुविधा

| घरांचे स्वरूप | एकूण घरे |
|---|---|
| कच्ची घरे | |
| अर्ध पक्की घरे | |
| पक्की घरे | |
| एकूण घरे | |

सन २०११ मध्ये जरी ही स्थिति असली तरी सन २०११ नंतर प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास योजना यामुळे कच्च्या घरांचे प्रमाण खूप कमी झाले आहे सन २०११ पासून मांडवे गावात घरांच्या संखेतही वाढ झाली असून सध्या एवढी घरे गावामध्ये आहेत. सन २०१७-१८ च्या अखेरीस घरांच्या प्रकारानुसार त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:

### तक्ता क्र.१२. मांडवे मधील १०१८ अखेरीस गृह सुविधा

| घरांचे स्वरूप | एकूण घरे |
|---|---|
| कच्ची घरे | |
| अर्ध पक्की घरे | |
| पक्की घरे | |
| एकूण घरे | |

मांडवे मधील बहुतांश घरे ही दगड व विटकमची असून त्यांना गल्वनाइज्ड लोह व सिमेंटच्या पत्र्याची छते आहेत. गावातील पेठेमध्ये प्रामुख्याने काही जुन्या बांधकामाची घरे तर काही नवीन बांधण्यात आलेली घरे आहेत. गावातील काही घरांमध्ये आर.सी.सी. स्लॅब व इतर आधुनिक बांधकाम क्षेत्रातील तांनात्रज्ञानाचा वापर केळ्याचे आढळून येते. काही गावातील बांधकामे व घरांची रचना शहरातील घरांसारखी करण्यात आली आहे. बरीचशी घरे ही एक किंवा दोन मजली

वरंडा असून समोर रास्ता आहे. गावातील मुख्य पेठेतील रस्त्याच्या बाजूच्या घरांमध्ये प्रवेशाजवळ व तळमजल्यावर दुकाने असून मागच्या बाजूस व घरातील वरील मजल्यावरराहण्याची सोय केलेली आढळून येते.

गावातील घरांची सद्यस्थिती सुधारण्याकरिता केंद्र व राज्य सरकारने बऱ्याचशा योजना व अनुदाने घोषित केली आहेत, यातील प्रमिख योजनांचा तपशील पुढीलप्रमाणे:

तक्ता क्र.१३. शासनाच्या गृहनिर्माण योजना

| योजनेचे नाव | लाभार्थी स्वरूप | अनुदान |
|---|---|---|
| प्रधानमंत्री आवास योजना | २०११ च्या सर्वेनुसार पात्र व्यक्ति | १,२०,००० |
| रमाई आवास योजना | अनुसूचीत जातीची पात्र व्यक्ति | १,२०,००० |
| | | |

## ६.२. पाणीपुरवठा

मांडवे गावामध्ये नियमित सकाळ व संध्याकाळी २ वेळा स्वच्छ व मुबलक पाणीपुरवठा केला जातो. त्यासाठी पाणीपुरवठा कर्मचारी आहे. गावामध्ये पाणीपुरवठ्याच्या २ विहिरी व २ जळकुंभ आहेत. विहीरींना बारमाही पाणी असते. एक विहीर गावठाण लगत नऊमोरी ओढ्यावर असून दुसरी विहीर गिरवी पूलाजवळील तळ्याच्या बांधाच्या खालच्या बाजूला आहे. गावात पाण्यामुळे कोणत्याही प्रकारे रोगांचा प्रादुर्भाव केव्हाही झालेला नाही. गावात नियमित प्रतिकुटुंब ५०० लीटर एवढा मुबलक पाणीपुरवठा केला जातो. पाणीपुरवठ्याची ही योजना गावठाणबरोबर वाड्या वस्त्यांवरही पोहचली आहे. विहीरींनमध्ये येणारे पाणी हे पाझरून येते व ग्रामपंचायत मार्फत नियमित पाण्यात TCL टाकून ते पाणी पिण्यायोग्य बनवले जाते. उन्हाळ्यातही गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत नाही. इतर बाजूच्या गावांना मांडवेच्या तलावतून उन्हाळ्यामध्ये टॅकर ने पाणीपुरवठा शासनाकडून केला जातो

गावामध्ये बरीचसी कुटुंबे शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी पावसाळ्यात ॲक्वाचे पाणी विकत घेतात. मांडवे गावामध्ये मुलाणीवस्ती येथे बचत गटाचे ॲक्वाचे यूनिट कार्यरत आहे तसेच गावातील बहुतांश कुटुंबामध्ये पावसाळ्यात शुद्ध पाणी पिण्यासाठी घरगुती वॉटर फिल्टरचा वापर करतात. इतर गावांप्रमाणे मांडवे गावामध्ये पिण्याच्या तसेच शेतीच्या पाण्याची अजिबात समस्या जाणवत नाही हे खूप मोठे गावाचे वैभव आहे.

चित्र क्र. ११. पाणी पुरवठ्याचे स्त्रोत







## ६.३. विविध विकासकामे

ग्रामपंचायतिची लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार ७८८३ एवढी होती. ही लोकसंख्या नेहमी वाढतच राहते. लोकसंख्येच्या वाढीबरोबर गावातील विकास कामांचाही वेग वाढवावा लागतो. त्यासाठी शासन लोकसंख्येच्या निकषानुसार प्रत्येक गावाला विकास कामांसाठी शासकीय निधीतून वेगवेगळ्या कामांसाठी अनुदान देत असते. मांडवे गावालाही अशा योजनांचा लाभ मिळतो. त्या काही प्रमुख योजना खलीलप्रमाणे :

१) अनुसूचीत जाती व नवबौद्ध घटकांचा विकास करणे( दलित वस्ती सुधार योजना )
२) १४ वा वित्त आयोग
३) वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना
४) रोजगार हमी योजना
५) नागरी सुविधा
६) तीर्थक्षेत्र विकास
७) खासदार / आमदार निधि
८) २५१५ – इतर ग्रामीण विकास कार्यक्रम
९) जन सुविधा योजना

/ पाणंद रस्ते करणे, कोंक्रिट / बंदिस्त गटारी बंधने, हायमास्ट दिवे बसविणे, व्यापारी गाळे बांधणे, सौर दिवे बसविणे, घाट बांधणे, पेव्हिंग ब्लॉक बसविणे, पाणीपुरवठा करणे, पाण्याची टाकी बांधणे, तलाव दुरूस्ती करणे / गाळ काढणे, पूल बांधणे अशी अनेक कामे गावाच्या विकासासाठी करता येतात. मांडवे गाव हे तालुक्यात तसेच जिल्ह्यामध्ये कामे करण्याच्या बाबतीत आघाडीवर असते. मांडवे गावामध्ये मागील काही वर्षात विकास कामांना गती मिळाली आहे. वाड्या वस्त्यांवरही खूप मोठी विकास कामे झाली आहेत.

## चित्र क्र. १२. मांडवे गावातील काही विकास कामे



# S-Sanitation

| अ.क्र. | मुद्दा | निकष | पर्यावरण संतुलितसमृद्ध ग्राम योजने अंतर्गत पुरस्कार प्राप्तग्रामपंचायत | ५००० पेक्षा जास्त लोकसंख्येची ग्रामपंचायत | सर्व साधारण ग्रामपंचायत | ग्रामपंचायत माहिती | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक शौचालयाची सुविधा व वापर | १००%शौचालयाची सुविधा व वापर | ८ | ८ | ८ | १०० % वापर आहे | ८ |
| | | ७५-९९ %शौचालयाची सुविधा व वापर | ४ | ४ | ५ | - | - |
| | | ५०-७४ %शौचालयाची सुविधा व वापर | ० | २ | ३ | - | - |
| | | २५-४९ %शौचालयाची सुविधा व वापर | ० | ० | ० | - | - |
| २ | सार्वजनिक इमाग्रामपंचायत हद्दीतील एकूण घरे व प्रत्यक्षात नळ जोडणी याची टक्केवारी विचारात घेऊन गुणांकण करावे रतीमधील शौचालय सुविधा व वापर | ग्रामपंचायत हद्दीतील सार्वजनिक शौचालय, सर्व शाळा, अंगणवाड्या व सार्वजनिक इमारती मधील स्वच्छतागृह सुविधा व वापर प्रत्येकी ०.५ गुण, नसल्यास ० गुण | सर्व असल्यास २ गुण | सर्व असल्यास २ गुण | ४ पैकी २ बाबी असल्यास २ गुण | सर्व इमारतींना सुविधा आहे. | २ |
| ३ | पाणी गुणवत्ता तपासणी | मागील वर्षामध्ये ग्रामपंचायतीद्वारे गावामध्ये पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या मुख्य स्त्रोतास, आरोग्य विभागामार्फत देण्यात येणाऱ्या गुणांकणानुसार सदर स्त्रोतास मागील वर्षभरात एकदा जारी लाल कार्ड प्राप्त असल्यास शुन्य गुण, लाल कार्ड प्राप्त नसेल व पिवळे कार्ड प्राप्त असल्यास १ गुण , लाल व पिवळे कार्डग्रामपंचायत हद्दीतील एकूण घरे व प्रत्यक्षात नळ जोडणी याची टक्केवारी विचारात घेऊन गुणांकण करावेप्राप्त नसेल व हिरवे कार्ड प्राप्त असल्यास २ गुण व मागील वर्षभरात चंदेरी कार्ड प्राप्त असल्यास ३ गुण | ३ | ३ | ३ | चंदेरी कार्ड प्राप्त आहे | ३ |
| | घरगुती नळ जोडणी | ग्रामपंचायत हद्दीतील एकूण घरे व प्रत्यक्षात नळ जोडणी याची टक्केवारी विचारात घेऊन गुणांकण करावे<br>१००% | २ | २ | २ | १०० % नळ जोडणी आहे | २ |
| | | ७५-९९% | १ | १ | २ | - | - |
| | | ५०-७४% | ० | ० | १ | - | - |
| ४ | सांडपाणी व्यवस्थापन | सांडपाणी जोडणारी घरे (१०० % गटारे असल्यास १ गुण अन्यथा ० गुण अथवा जेथे गटरीने अंशत: जोडणी केली आहे तथापि उर्वरित ठिकाणी जोडणी देणे शक्य नाही अशा घरांकरिता एम जी नरेगा अंतर्गत एकत्रित | १ | १ | १ | १०० % बंदिस्त गटारी आहेत | १ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ० गुण) | | | | | | |
| | | एकूण गटारांच्या लांबीच्या प्रमाणात बंदिस्त/ भूमिगत गटारांची एकूण लांबी | १००% | ३ | ३ | ३ | **१०० %** **बंदिस्त गटारी आहेत** | **३** |
| | | | ७५-९९% | १ | १ | २ | - | - |
| | | | ५०-७४% | ० | ० | ० | - | - |
| ५ | घन कचरा व्यवस्थापन | घर / कुटुंबातील कचरा ग्रामपंचायती मार्फत वाहून नेणे व त्याची योग्य विल्हेवाट लावणे | | १ | १ | १ | **१०० % घन कचऱ्याची विल्हेवाट ग्रा.पं.कडून लावली जाते** | **१** |

# M-Management (व्यवस्थापन)

| अ.क्र. | मुद्दा | निकष | | पर्यावरण संतुलितसमृद्ध ग्राम योजने अंतर्गत पुरस्कार प्राप्तग्रामपंचायत | ५००० पेक्षा जास्त लोकसंख्येची ग्रामपंचायत | सर्व साधारण ग्रामपंचायत | ग्रामपंचायत माहिती | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पायाभूत सुविधांचा विकास | ग्रामपंचायतीची स्वतंत्र इमारत, स्मशान भूमी व विकसित बाजारपेठ (ओटे / बाजार गाळे ) करिता प्रत्येकी १ गुणाप्रमाणे एकूण ३ गुण | | ३ | ३ | ३ | इमारत, स्मशानभूमी व विकसित बाजारपेठ आहे. | ३ |
| | | सार्वजनिक क्रिडांगण, ग्रंथालय, व्यायामशाळा व सार्वजनिक उद्यान याकरिता प्रत्येकी १ गुण याप्रमाणे ४ गुण. | | सर्व असल्यास ४ गुण | सर्व असल्यास ४ गुण | ४ पैकी २ बाबी असल्यास ४ गुण | क्रिडांगण, ग्रंथालय, व्यायामशाळा व सार्वजनिक उद्यान आहे | ४ |
| २ | आरोग्य व शिक्षण विषयक सुविधा | लसीकरण सत्र नियमितपणे झाले असल्यास १ गुण, नसल्यास ० गुण | | १ | १ | १ | नियमित लसीकरण केले जाते | १ |
| | | १०० % बाळंतपण दवाखान्यात झाले असल्यास २ गुण अन्यथा ० गुण | | २ | २ | २ | १०० % बाळंतपण दवाखान्यात होतात | २ |
| | | मागील वर्षात गावामध्ये साथीच्या आजाराचाप्रादुर्भाव झाला असल्यास० गुण , नसल्यास २ गुण | | २ | २ | २ | साथीचे आजार नाहीत | २ |
| | | बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण | सेव्हिअर(Severe )/ मोडरेट ॲक्युट मालन्यूट्रिशन नसल्यास २ गुण, असल्यास ० गुण | २ | २ | २ | बालकांमध्ये कुपोषण नाही | २ |
| | | ग्रामपंचायत हद्दीतील चालू असलेल्या सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण | ५ % पेक्षा असल्यास | २ | २ | २ | ० % गळतीचे प्रमाण आहे | २ |
| | | | ५ - १० % असल्यास | १ | १ | १ | - | - |
| | | | १० - २० % असल्यास | ० | ० | ० | - | - |
| | | | २० % पेक्षा जास्त असल्यास | ० | ० | ० | - | - |
| ३ | केंद्र शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी | एम जी नरेगा योजनेमध्ये ग्रामपंचायती अंतर्गत प्राप्त झालेल्या मागणीप्रमाणे जॉब कार्ड १०० % देण्यात आले आहेत काय, असल्यास १ गुण, नसल्यास ० गुण | | १ | १ | १ | १०० % जॉब कार्ड देण्यात आली आहेत | १ |
| | | ग्रामीण घरकुल योजनेचे स्वच्छ भारत | प्रधानमंत्री आवास योजना/ रमाई घरकुल / शबरी आवास योजनेअंतर्गत ठरवून दिलेल्या | १ | १ | १ | उद्दिष्टाप्रमाणे सर्व घरकुले शौचालयासह | १ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अभिसरण | घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असल्यास १ गुण, नसल्यास ० गुण | | | | | |
| | | | दिनदयालउपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसाहाय्य योजनेअंतर्गत विविध प्रवर्गातील बेघर-भूमिहीनांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे काय, असल्यास १ गुण नसल्यास ० गुण | १ | १ | १ | प्रस्ताव सदर केलेला आहे | १ |
| | | सुकन्या समृद्धी योजना ग्रामपंचायत हद्दीतील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबात जन्मणाऱ्या एकूण मुलींपैकी ८० % पेक्षा जास्त मुलींचा सहभाग असल्यास १ गुण, नसल्यास ० गुण | | १ | १ | १ | ८० % पेक्षा जास्त मुलींचा सहभागआहे | १ |
| | | अटल पेन्शन योजना १८ ते ४० वयोगटातील असंघटित क्षेत्रातील सर्व बचत बँक खातेधरकांपैकी ८० % पेक्षा जास्त ग्राहकांनी भाग घेतल्यास १ गुण, नसल्यास ० गुण | | १ | १ | १ | ८० % पेक्षा जास्त ग्राहकांचा सहभाग आहे | १ |
| | | जनधन योजना – एकूण लाभधारक घटकांपैकी ९० पेक्षा जास्त असल्यास ग्रामस्थांनी या योजनेमध्ये खाते उघडल्यास १ गुण, ७५ ते ८९ % असल्यास ०.५ गुण व ७५ % पेक्षा कमी असल्यास ० गुण | | १ | १ | १ | ९० पेक्षा जास्त ग्रामस्थांनी या योजनेमध्ये खाते उघडले आहे | १ |
| ४ | बचत गट | गावातील बचत गटापैकी दशसूत्रीचे पालन करणाऱ्या बचतगटांत महिलांचा सहभाग | गावातील महिलांपैकी ७५% वा त्यापेक्षा जास्त महिलांचा समावेश असल्यास | २ | २ | २ | ७५% पेक्षा जास्त महिला बचत गटामध्ये सहभागी आहेत | २ |
| | | | ५०-७४ % असल्यास | १ | १ | २ | - | - |
| | | | २५-४९ % असल्यास | ० | ० | १ | - | - |
| ५ | प्लास्टीक वापर बंदी | ५० % पेक्षा कमी मायक्रोनचे प्लास्टीक वापरास बंदी घालण्याबाबत ग्रामसभेचा ठराव व त्या अनुषंगाने अंमलबजावणी केली असल्यास१ गुण, नसल्यास ० गुण | | १ | १ | १ | प्लास्टीक वापरावर बंदी आहे | १ |

# A-Accountability (दायित्व)

| अ.क्र. | मुद्दा | निकष | | पर्यावरण संतुलितसमृद्ध ग्राम योजने अंतर्गत पुरस्कार प्राप्तग्रामपंचायत | ५००० पेक्षा जास्त लोकसंख्येची ग्राम पंचायत | सर्व साधारण ग्राम पंचायत | ग्रामपंचायत माहिती | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायतीच्या घरपट्टी / पाणीपट्टी वसूली व पाणी पुरवठा व पथ दिवे यासाठी वापरण्यात येणाऱ्या वीज बिले नियमितपणे भरणे | मागील वर्षाची घरपट्टीची क्षेत्रफळावर आधारीत वसूली | १०० % असल्यास | १ | १ | १ | १०० % कर वसुली आहे | १ |
| | | | ८०-१०० % असल्यास | ० | ० | १ | - | - |
| | | मागील थकबाकीसह पाणीपट्टी वसूली | १०० % असल्यास | १ | १ | १ | १०० % पाणीपट्टी वसूली आहे | १ |
| | | | ८०-१०० % असल्यास | ० | ० | १ | - | - |
| | | ग्रामपंचायतीमार्फत करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा व पथ दिवे इ. सुविधांकरिता येणारी वीज बिले नियमितपणे भरणे मागील २ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीचे देयक प्रलंबित नसल्यास २ गुण, असल्यास ० गुण | | २ | २ | २ | दरमहा नियमित बिल भरले जाते | २ |
| २ | मागासवर्गीय / महिला व बाल कल्याण / अपांगवरील खर्च | १५ % मागासवर्गीय, १० % महिला बालकल्यानावार व ३ % अपंगावर अनुशेषासह१०० % खर्च झाला असल्यास प्रत्येकी १ गुण, नसल्यास प्रत्येकी ० गुण | | ३ | | ३ | १०० % खर्च पूर्ण आहे | ३ |
| ३ | लेखापरीक्षण शकांची पूर्तता | १ एप्रिल रोजी प्रलंबित शकापैकी १०० % शकांची पूर्तता झाल्यास २ गुण | | २ | २ | २ | १०० % शकांची पूर्तता केली आहे | २ |
| | | १ एप्रिल रोजी प्रलंबित शकापैकी ७५-९९ % शकांची पूर्तता झाल्यास २ गुण | | १ | १ | १ | - | १ |
| ४ | ग्रामसभेचे आयोजन | सहाही सभा गणसंख्येअभावी तहकूब न झाल्यास २ गुण, ६ पैकी ४ सभा गणसंख्ये अभावी तहकूब झाल्यास १ गुण, अन्यथा ० गुण | | २ | २ | २ | एकही सभा तहकूब नाही | २ |
| | | नियमित ग्रामसभेच्या आदल्या दिवशी महिला ग्रामसभेचे आयोजन करण्यात आल्यास १ गुण, नसल्यास ० गुण | | १ | १ | १ | नियमित महिला ग्रामसभा होतात | १ |
| ५ | सामाजिक दायित्व | सेवांची व दाखल्यांची मागणी मुदतीत पूर्तता केल्याचे प्रमाण- १०० % पूर्तता व अपील नसल्यास २ गुण, ७५-९९ % पूर्तता केली असल्यास १ गुण, ७५ % पेक्षा असल्यास ० गुण | | २ | २ | २ | मुदतीत पूर्तता केली आहे व अपील नाही | २ |
| | | मादक द्रव्यांची विक्री व सेवन यावर ग्रामसभेने ठराव घेवून सदर बंदीची अंमलबजावणी करण्यात येत आहे काय असल्यास १ गुण, नसल्यास ० गुण | | १ | १ | १ | ठराव करून बंदी घातली आहे | १ |
| | | मागील ग्रामपंचायतीची निवडणूक बिनविरोध झालीआहे काय, असल्यास १ गुण, नसल्यास ० गुण | | १ | १ | १ | ग्रामपंचायत बिनविरोध नाही | ० |
| | | मागील २ वर्षात गावामध्ये सामुदायिक विवाह सोहळा/ आंतरजातीय विवाह आयोजित करण्यात आले आहेत काय, असल्यास २ गुण, नसल्यास ० गुण | | २ | २ | २ | आंतरजातीय विवाह झाले आहेत | २ |
| | | मागील वर्षात गावात | एकही फौजदारी गुन्हा नोंदविण्यात आलेला नसल्यास २ गुण | २ | २ | २ | - | - |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आलेल्या फौजदारी गुन्ह्यांचे प्रमाण | संख्येच्या ०-२ % असल्यास १ गुण | १ | १ | १ | ०.१५ % एवढे आहे | १ |
| | | | २% पेक्षा जास्त असल्यास ० गुण | ० | ० | ० | - | - |

# R-Renewable Enegry&Environment (अपारंपारिक ऊर्जा व पर्यावरण)

| अ.क्र. | मुद्दा | निकष | | पर्यावरण संतुलितसमृद्ध ग्राम योजने अंतर्गत पुरस्कार प्राप्तग्रामपंचायत | ५००० पेक्षा जास्त लोकसंख्येची ग्रामपंचायत | सर्व साधारण ग्राम पंचायत | ग्राम पंचायत माहिती | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | LED बल्ब व पथ दिवे यांचा वापर | वीज जोडणी असलेल्या घरात किमान एक LED बल्बचा वापर असणे | १००% | ४ | ४ | ४ | **१०० % LED बल्बचा वापर आहे** | ४ |
| | | | ७५ - ९९ % | २ | २ | २ | - | - |
| | | | ५० - ७४ % | ० | ० | १ | - | - |
| | | | २५ - ४९ % | ० | ० | ० | - | - |
| | | गावात असलेल्या विद्युत पथदिव्यांचे LED पथदिव्यांमध्ये रूपांतर | १००% | २ | २ | २ | **१०० % LED पथदिवे आहेत** | २ |
| | | | ७५ - ९९ % | १ | १ | १ | - | - |
| | | | ५० - ७४ % | ० | ० | १ | - | - |
| २ | गावात असलेले सौर पथदिवे चालू असणे (सर्व योजनेतील) | १००% | | २ | २ | २ | **१०० % सौर पथदिवे चालू आहेत** | २ |
| | | ७५ - ९९ % | | १ | १ | १ | - | - |
| | | ५० - ७४ % | | ० | ० | १ | - | - |
| ३ | बायोगॅस संयंत्र | ग्रामपंचायत हद्दीत किमान २ बायोगॅस संयंत्र कार्यरत असणे, असल्यास १ गुण, नसल्यास ० गुण | | १ | १ | १ | **२ पेक्षा जास्त बायोगॅस संयंत्र आहेत** | १ |
| ४ | वृक्ष लागवड | गावातील भौगोलिक परिस्थितीनुसार वृक्ष निवड करून ग्रामपंचायत हद्दीत रस्त्याच्या दुतर्फा ग्रा पं. च्या अखत्यारीत जागेत वा खाजगी जागेत शास्त्रोक्त पद्धतीने खड्डा खणून आवश्यक ते खत व सिंचन उपलब्ध करून व संरक्षक जाळी अथवा कुंपनासह केली असलेली वृक्ष लागवड गावातील एकूण लोकसंख्येच्या २० % वा त्यापेक्षा जास्त असल्यास ५ गुण, १५-२० % असल्यास ४ गुण, १०-१५% असल्यास ३ गुण, 5-10 % असल्यास २ गुण,1-5% असल्यास १ गुण व १ % पेक्षा कमी वृक्ष असल्यास ० गुण. सदर वृक्ष संख्या मोजताना, ग्रामपंचायत हद्दीत व्यावसायिक तत्वावर करण्यात आलेल्या फळबागा मधील वृक्ष लागवड विचारात घेतली जाऊ नये. | | ५ | ५ | ५ | **२८,००० वृक्ष लागवड ग्रा. पं. हद्दीमध्ये केलेली आहे** | ५ |
| ५ | जलसंधारण | मागील आर्थिक वर्षात लोकसहभागातून जलयुक्त शिवार अभियान, पाणलोट क्षेत्र अभियान, पाणी पुनर्वापारा संदर्भात केलेली कामे, गाळ काढणे, वनराई बंधारा, गबीयन बंधारा, नाला सरळीकरण व जलसंधरणाची इतर कामे- यापैकी २ कामे | | ५ | ५ | ५ | **गाळ काढणे, गबियन बंधारा,वनराई बंधारा,नाला सरळीकरण** | ५ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कोणतेही काम केले नसल्यास ० गुण. | | | | | आहेत | |